# महावितरण
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासनाचा (उपक्रम)

CIN : U40109MH200SSGC153645

दुरध्वनी क्र. : २६४७४२११/२६४७२१३१
वि.क्र. ३६२४
Website : www.mahadiscom.in
E-mail : dccell@mahadiscom.in

शिस्तभंग कारवाई कक्ष
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.


क्र. मासं/शिनि/शिस्तभंग प्रकरणे/२०१७/ - 427 दिनांक : 07 SEP 2017

## परिपत्रक

**विषय :-** शिस्तभंग विषयक प्रकरणे जास्तीत जास्त ६ महिन्याचे कालावधीत निकाली काढणेबाबत.

**संदर्भ:-** १) विभागीय परिपत्रक क्र. ५० दि. २९/११/१९७४ (गोपनीय).
२) परिपत्रक क्र. साप्रवि/व्ही/३७२५ दि. ०४/०२/२००३.
३) परिपत्रक क्र. मासं/शिनि/३२९४२ दि. ०४/०९/२०१५.
४) परिपत्रक क्र. मासं/शिनि/सर्वोच्च न्यायालय निर्णय/८३२७ दि.१७/०३/२०१६.

---------------

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, सांघिक कार्यालयाने वरील संदर्भिय परिपत्रक क्र. ३ अन्वये शिस्तभंग कारवाईच्या प्रकरणाचा त्वरित निपटारा होण्याकरीता निर्देश तथा मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आलेली आहे सदर परिपत्रकान्वये शिस्तभंग प्रकरणे ६ महिन्याचे कालावधीत निर्णयाकिंत करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करणेकरीता कळविले आहे. वरील संदर्भिय परिपत्रक्र क्र. ४ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी अपील क्र. ९५८/२०१० मध्ये दि. १६/१२/२०१५ रोजी दिलेल्या निर्देशान्वये विभागीय चौकशीचे कामकाज ६ महिन्याचे कालावधीत निकाली काढण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत.

सांघिक कार्यालयाने वेळोवेळी प्रस्तृत केलेल्या परिपत्रकान्वयेही शिस्तभंग कारवाईची प्रकरणे ६ महिन्याचे आत निकाली काढणेबाबतच्या सूचना तथा निर्देश दिलेले आहेत. तथापि, सांघिक कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, कर्मचारी सेवाविनियम क्र. ८८ अंतर्गत गैरवर्तणूकीची शिस्तभंग कारवाई प्रकरणे वर्षानुवर्ष प्रलंबित राहतात. तसेच कर्मचारी सेवाविनियम क्र. ८७ मधील तरतुदीनुसार गौण चुकाअंतर्गत सक्षम अधिकाऱ्यांकडुन कर्मचाऱ्यांचे स्पष्टीकरण तथा खुलासा मागविला जातो किंवा वेतनाच्या १/३ एवढया रक्कमेच्या दंड वसुलीबाबत कारणे दाखवा नोटीस निर्गमित केल्या जातात व त्यावर पुढील कोणतीही कारवाई न करता अशी काही प्रकरणे १० वर्षापेक्षा जास्त काळ दुर्लक्षित केल्यामुळे प्रलंबित राहात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांस पदोन्नती, उच्च वेतनश्रेणीचा लाभ व सेवानिवृत्तीच्या वेळी अंतिम देयके मिळण्यास विलंब होतो.

मानव संसाधन विभागाच्या दि. ०८/०८/२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या शिस्तभंग प्रकरणाविषयी तीव्र नाराजी दर्शविली असून सर्व शिस्तभंग विषयक प्रकरणे ६ महिन्याच्या मर्यादित कालावधीमध्ये निर्णयांकित झालेच पाहिजे अशी आग्रही भूमिका मांडलेली आहे.

सबब, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार शिस्तभंग प्रकरणामध्ये कारवाई तथा निर्णय घेणारे सर्व सक्षम अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे की, आरोपीत कर्मचाऱ्यास आरोपपत्र दिल्यानंतर त्यांचेवरील अंतिम शिक्षा आदेशापर्यंतची सर्व कार्यवाही ६ महिन्याचे कालावधीत पूर्ण करावी. याबाबत असेही निर्देशित करण्यात येते की, क्षेत्रिय कार्यालयातील ६ महिन्यावरील सर्व प्रलंबित गैरवर्तणुकीच्या कृत्याअंतर्गतची प्रकरणे (Acts of Misconduct) व गौण चुकाअंतर्गत (Minor Lapses) प्रलंबित प्रकरणे विशेष मोहिमेअंतर्गत (Special Drive) एक महिन्याच्या आत निर्णयांकित करावी. भविष्यात शिस्तभंगाची प्रकरणे ६ महिन्यापेक्षा ज्रास्त कालावधीसाठी प्रलंबित असल्याचे आढळल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रकाची तातडीने व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची प्रत R-APDRP- Portal वर उपलब्ध करण्यात आली आहे.

07/09.

(सचिन ढोले)
**कार्यकारी संचालक (मासं)**